# भारतीय जनता पार्टी, मुंबई

**BHARATIYA JANATA PARTY, MUMBAI**

वसंत स्मृती, 3 रा मजला, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पूर्व), मुंबई - 400014
दूरध्वनी : 2418 3290 फॅक्स : 2415 0462 E-mail : bjpmbi@vsnl.net

कृपया प्रकाशनार्थ
FOR FAVOUR OF PUBLICATION

मुंबई - मंगळवार | दि.4 नोव्हेंबर 2008

## दुबार मतदारांची नावे रद्द करण्याबाबत कारवाई करण्याचे मुख्य निवडणूक अधिका-यांचे आश्वासन

नविन पुनर्रचित उत्तर मुंबई लोकसभा क्षेत्रातील 3,57,520 म्हणजेच 20% दुबार मतदारांची तपासणी करून दुबार नावे त्वरीत मतदार यादीतून वगळावी अशी आग्रही मागणी पुन्हा एकदा माजी केंद्रीय पेट्रोलियम मंत्री श्री राम नाईक यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री देबाशिष चक्रवर्ती यांच्याकडे सोमवारी झालेल्या सर्व राजकीय पक्षांच्या बैठकीत केली.

29 एप्रिल 2008 रोजी या संदर्भातील प्रथम मागणी श्री राम नाईक यांनी निवडणूक आयोगाकडे केली होती. त्या वेळेस मुख्य निवडणूक अधिका-यांनी 31 जुलै 2008 रोजी मतदार याद्या तयार झाल्यानंतर याबद्दल कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले होते परंतू अद्याप पावेतो या संदर्भात योग्य ती कार्यवाही झाली नाही. श्री राम नाईक यांनी दुबार मतदार निदर्शनास आणल्यावर राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-यांनी या संदर्भात प्रायोगिक तत्वावर तपासणी केली असता श्री नाईक यांच्या दाव्यात तथ्य आढळल्याचे राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला 9 जून 2008 रोजी पत्राव्दारे कळविले होते.

श्री राम नाईक यांनी या संदर्भातील आग्रही मागणी पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याच्या मुख्य निवडणूक अधिका-यांकडे केल्यानंतर दुबार मतदार तपासण्याच्या संदर्भातील सॉफ्टवेअर लवकरात लवकर तयार केले जाऊन या संदर्भातील कार्यवाही करु असे आश्वासन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री देबाशिष चक्रवर्ती यांनी सर्व राजकीय पक्षांच्या बैठकीत दिले.

(विवेकानंद गुप्ता)
प्रसिध्दी प्रमुख